www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३९ वा रविवार दि. 02 फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## प्राध्यापक जगन्नाथ रासवे सरांना ‘साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार 2025’ प्रदान

दैनिक युवक आधार
छत्रपती संभाजीनगर



सामाजिक, शैक्षणिक आणि उत्कृष्ट पत्रकारितेतील भरीव योगदानासाठी प्राध्यापक जगन्नाथ रासवे सर यांना ‘राष्ट्रीय राज्यस्तरीय साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार 2025’ प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार समारंभ आज सायंकाळी 5:30 वाजता संपन्न होणार आहे. प्राध्यापक जगन्नाथ रासवे सर हे सामाजिक कार्यासोबतच शिक्षण क्षेत्रात अत्यंत प्रेरणादायी कार्य करत आहेत. त्यांचा पत्रकारितेतील ठसा हा नेहमीच निर्भीड व समाजभिमुख राहिला आहे. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार 2025 त्यांना बहाल करण्यात आला आहे. या सन्मानाबद्दल दैनिक युवक आधार व माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण प्रतिनिधी आणि संपूर्ण टीमतर्फे प्रा. जगन्नाथ रासवे सरांना हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा!

– **आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

### ॲब्ज कोअर पॅशन फॉर फिटनेस या युनिसेक्स जिमचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते

## जिम लव्हर्स साठी आधुनिक तंत्रज्ञानातून फिटनेस सेंटर उपलब्ध ...आमदार थोरवे

.. दैनिक युवक आधार
खोपोली वार्ताहर

खोपोली शहरातील नामवंत ज्येष्ठ समाजसेवक माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम पाटील यांचे सुपुत्र एस.पी. डेव्हलपरचे संचालक शहानवाज पाटील यांच्या संकल्पनेतून अब्ज कोअर पॅशन फॉर फिटनेस या युनिसेक्स जिमची ग्रँड ओपनिंग कर्जत- खालापूर मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र शेठ थोरवे यांच्या हस्ते संपन्न झाले . या कार्यक्रमाला शुभेच्छा आशीर्वाद देण्यासाठी राजकीय, सामाजिक, क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते . शारिरीक व्यायाम पध्दतीत संशोधन करून तज्ञांच्या परीक्षणानुसार जागतिक दर्जाच्या आधुनिक बनावटीचे एक्सरसाइज उपकरणे प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक व्यायाम,वजन यांचे संतुलन करून योगा ,झुंबा, कॅलिस्थेनिक्स क्रॉस फिट ,स्वतंत्र सुरक्षित लेडीज बाथ,कार्यात्मक प्रशिक्षण, मसाज सेंटर,स्टीम रूम अशा एक न अनेक सोयी सुविधा जिम मध्ये उपलब्ध आहेत अशी माहिती जिम हेड प्रशिक्षक अरुणा भारती यांनी माध्यमांना दिली. या सर्व महत्त्व पूर्ण वर्क आऊट ट्रेनिंग ठिकाणी प्रथम प्रवेशिकांना आकर्षक सूट विशेष सवलती मिळणार आहे . खोपोलीकरांसाठी व जिम लवर्सने या शुभ प्रसंगी मोठी गर्दी केली होती. खोपोलीकरांच्या सेवेत सदैव अभिनव उपक्रम राबवित शहानवाज इब्राहिम पाटील मित्र परिवाराने या शुभप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत ,सन्मान करून आभार मानले.




# अर्थसंकल्पादिवशीच सरकारला मिळाली गुड न्यूज, जीएसटीने भरला खजिना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तेवर असलेल्या सरकारचा अर्थसंकल्प आज वित्तमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केला. या अर्थसंकल्पामधून वित्तमंत्र्यांनी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. दरम्यान, आज अर्थसंकल्प सादर होत असतानाच केंद्र सरकारसाठी एक चांगली बातमी समोर आली आहे. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर केंद्र सरकारनेजीएसटी कलेक्शनचे जानेवारी महिन्यातील आकडे प्रसिद्ध केले आहेत. जानेवारी महिन्यात जीएसटीच्या माध्यमातून सरकारच्या खजिन्यात १.९६ लाख रुपयांची भर पडली आहे.जानेवारी महिन्यातील सरकारचं जीएसटी कलेक्शन हे मागच्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १२.३ टक्क्यांनी वाढलं आहे. तसेच तसेच मागच्या महिन्यात सेंट्रल जीएसटी कलेक्शन ३६ हजार १०० कोटी रुपये आणि स्टेट जीएसटी कलेक्शन ४४ हजार ९०० रुपये एवढं नोंदवलं गेलं आहे. तत्पूर्वी डिसेंबर २०२४ या महिन्यातील जीएसटी कलेक्शन हे १.७६ लाख कोटी रुपये एवढं होतं, ते वार्षिक आधारावर ७.३ टक्के अधिक होतं. जानेवारी महिन्यातील जीएसटीचा आकडा हा आतापर्यंच्या सर्वाधिक जीएसटी कलेक्शनपेक्षा किंचित कमी राहिला आहे. याआधी गतवर्षी एप्रिल महिन्यात जीएसटी कलेक्शन २ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेलं होतं. जीएसटी कलेक्शनचा आकडा सातत्याने वाढत आहे आणि सरकारच्या खजिन्यामध्ये भर पडत आहे. याआधी सप्टेंबर महिन्यात हा आकडा १ लाख ७३ हजार २४०, ऑक्टोबर महिन्यामध्ये १ लाख ८७ हजार ३४६, तर नोव्हेंबर महिन्यात १ लाख ८७ हजार ३४६ कोटी रुपये एवढा जीएसटी गोळा झाला होता.




## लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे शाळेत दहावीचा निरोप समारंभ साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**

लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे शाळेत दहावीचा निरोप समारंभ कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.गौरव पोरवाल सर, प्रमुख पाहुणे मा. श्री. राम निरंजन शर्मा (रिटायर्ड सायंटिफिक ऑफिसर बी. ए. आर. सी), विद्यालयाचे चेअरमन मा. श्री. जयदास गोवारी साहेब, व्हाईस चेअरमन मा. श्री. विनायक म्हात्रे सर, मा.श्री. अद्वैत सर (राष्ट्रीय बॉक्सिंग प्रशिक्षक), स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. गावंड सर, सर्व सेवक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने झाली त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थीनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गावंड सर यांनी केले, त्यानंतर नववीची विद्यार्थिनी श्रावणी रणनवरे,दहावीचे विद्यार्थी श्रेया कदम, पायल, रोहिणी कांबळे, श्याम राठोड या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री.फर्डे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना पुढील भविष्यासाठी खूप मेहनत घ्या,खचून न जाता पुन्हा उमेदवार उभे राहून यश संपादन करा, या पद्धतीने मार्गदर्शन केले व परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे चेअरमन श्री. जयदास गोवारी सर व बॉक्सिंग प्रशिक्षक श्री. अद्वैत सर यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. राम निरंजन शर्मा सर यांनी येणाऱ्या खडतर प्रवासामध्ये आपण संकटांवर मात करून यश कसे संपादन करावे, त्याचबरोबर त्यांनी आपले सायंटिफिक ऑफिसर असताना जे काही अनुभव आले आहेत ते विद्यार्थ्यांना सांगितले व विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली . शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.गौरव पोरवाल साहेब यांनी विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करावा व आपल्या शाळेचे व आपल्या कुटुंबाचे नाव उज्वल करावे, येणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. अशाप्रकारे हा निरोप समारंभाचा कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता म्हेत्रे, श्रुतिका जानकर, पूर्वा वाळुंज, विद्या गुंड, सलमा खातुर या विद्यार्थ्यांनी केले.



## हरभऱ्यात उंदीर आणि साप, शेतकऱ्यांच्या डोक्याला ताप प्रशांत तांबोळकर..

**दैनिक युवक आधार आधार**
**शिरूरआनंतपाळ :**

रानडुक्कर, हरिण आणि उंदीर यांच्या उपद्रवामुळे हरभरा, ज्वारी व गव्हु पिकाचे अतोनात नुकसान होत आहे. गव्हाच्या ओंब्या परिपक्व होत असुन शेवटचे पाणी गव्हाला देत असतांना साप आढळुन येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना जीवावर उद्बार होऊन पाणी द्यावे लागत आहे. खरिप असो वा रब्बी हंगामातील पिके घेत असतांना शेतकऱ्यांना नैसर्गीक आपत्तीबरोबरच वन्यप्राण्यांच्या समस्सेला सामोरे जावे लागत आहे.शिरुरआनंतपाळ तालुक्यात रब्बी हंगामात सर्वाधीक पेरणी हरभऱ्याची होत असते. त्यापाठोपाट गव्हाची पेरणी शेतकरी करीत असतात. यावर्षी पोषक वातावरणामुळे गव्हु व हरभरा चांगलाच बहरला आहे. माञ पोटऱ्यात आलेली ज्वारीचे पिक रानडुक्कर आडवी पाडुन कणसे खाऊन फस्त करत आहे तर गव्हु व हरभऱ्यात उंदराचा उपद्रव वाढला असुन उंदराला खाण्यासाठी सापाचा वावर वाढला आहे.



**सध्या गव्हु पोटऱ्यात असुन हरभऱ्याला घाटे भरले आहेत. त्यातच वनप्राण्यांचा हौदौस वाढल्याने पिकाचे नुकसान होत आहे.**

**खाणे कमी नासाडी जास्त...**
उंदीर धान्य खाण्याऐवजी गव्हु व हरभऱ्याचे पिक बुडातुन कुरतुडुन टाकतात. तर उंदराला खाण्यासाठी गव्हाच्या व हरभऱ्याच्या पिकामध्ये सापाचा वावर वाढला असुन शेतकऱ्यांना जीवावर उध्दार होऊन पिकाला भुईटी पाणी द्यावे लागत असल्याचे येरोळ येथील शेतकरी गुंडेराव चौसष्टे यांनी सांगितले.

**खाद्य पदार्थात औषध**
उंदराचा बंदोबस्त करण्यासाठी काही शेतकरी पिंजरा व उंदराने गव्हु व हरभऱ्याच्या पिका मध्ये केलेल्या बिळामध्ये भज्जे पापडी व चुरमुऱ्याला झिंक फास्फराईडसह अन्य औषध मेडीकलवरुन आणुन लाऊन रानात टाकतात त्यामुळे काही प्रमाणात उंदराचा बंदोबस्त होत असल्याचे शेतकरी सांगतात

# अतिक्रमण हटवा अन्यथा आत्मदहन आंदोलन

### कार्यकारी अभियंत्यास काँग्रेसचा ईशारा

**दैनिक युवक आधार**
**नेवासा वार्ताहर**
**लखन वाल्हेकर**

**नेवासा फाट्यावरील अहिल्यानगर-** संभाजीनगर महार्गावरील दोन्ही बाजूकडील झालेले अतिक्रमण तातडीने हटवा अन्यथा शंभर कार्यकर्त्यांसह राजमुद्रा चौकात आत्मदहन करण्याचा ईशारा काँग्रेस पक्षाने जागतिक बँकेच्या कार्यकारी अभियंता यांना दिला. नेवासा फाटा येथे अहिल्यानगर -संभाजीनगर महामार्गवर झालेल्या अतिक्रमणमुळे सततची होत असलेली वाहतुक कोंडी, सततचे होणारे अपघात व निष्पाप लोकांचा जाणारा बळी,याचा महामार्गवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या सर्वांना नेवासा फाटा या ठिकाणी दोन्ही बाजूने झालेले अतिक्रमण जबाबदार असल्याचे स्पष्ट दिसून येते. नेवासा फाटा या ठिकाणी महामार्गवर मनमानी करून अनेक व्यवसायिकानी हातगाड्या, टपऱ्या, चहाचे दुकान, चौक उभारणी, साईड पट्ट्यावर फ्लेक्स उभारणी, दुकानाचे शेड रस्त्यापर्यंत उभारले यामुळे रस्त्याचा श्वास कोंडला असून फोर वे रस्ता हा सिंगल रस्त्याच्या स्वरूपात रूपांतरीत झाला आहे. याच कारणाने अपघात वाढण्याच्या घटना खूप मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. काँग्रेस पक्षाने या सर्वांची दखल घेत जागतिक बँकेचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेत अतिक्रमण काढण्याचे निवेदन दिले होते. सदर विभागाकडून अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढण्याचे आदेश नोटीशी द्वारे देण्यात आले होते. परंतु या नोटिशीचा कोणताही परिणाम अतिक्रमण धारकांवर झाला नाही.एकाही अतिक्रमण धारकांने अतिक्रमण काढले नाही.यामुळे काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यानी आज अहिल्यानगर येथे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन कठोर भूमिका घेत तातडीने अतिक्रमण काढण्यात यावे अशी भूमिका मांडली.अन्यथा शंभर कार्यकर्त्यांसह नेवासा फाटा येथील राजमुद्रा चौकात आत्मदहन आंदोलन करण्यात येईल असा ईशारा निवेदणाद्वारे देण्यात आला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, शहराध्यक्ष अंजुम पटेल, बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण, सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब काळे, बहुजन मुक्तीचे गणपत मोरे, आदिसह नागरिक उपस्थित होते. चौकट - अतिक्रमणमुळे कोंडलेला श्वास मोकळा करून अपघातात मृत झलेल्या कुटुंबास न्याय मिळवून देणार. यापुढे एकही अपघात नेवासा फाटा परिसरात होणार नाही यासाठी प्रयत्न करणार - अंजुम पटेल, शहराध्यक्ष नेवासा काँग्रेस

## चाकण MIDC परिसरात ' SIGNATURE FAMILY RESTO BAR , उद्घाटन संपन्न

. दैनिक युवक आधार
प्रतिनिधी किशोर गुडेकर

चाकण पुणे: चाकण MIDC येथील मर्सिडीज व SANY कंपनी परिसरात, नव्याने वातानुकूलित भव्य असे, फॅमिली रेस्टॉरंट ग्राहकांसाठी तयार झाले आहे, सदर हॉटेल चे उदघाटन आमदार दिलीप मोहिते पाटील लॉज चे उदघाटन आमदार बाबाजी शेठ काळे मराठी उद्योजक तुषार भाऊ गोरे यांच्या संकल्पनेतून हे साकार झाले आहे. या भागामध्ये खूप असे कंपनि बाहेर देशातील आहेत. या कंपनी ला विजिटिंग साठी व बऱ्याच कामानिमित्ताने सतत बाहेर देशातील लोकांचे येणे, जाने सतत चालू असते. त्यांना या परिसरात थांबण्यासाठी व जेवणासाठी उत्तम पर्याय निर्माण झाला आहे. श्री पोतदार सर यांच्या मार्गदर्शनाखाली खूप सुंदर डिजाइन व ग्राहकांना आजच्या धावपळीच्या वातावरणात आपल्या रेस्टॉरंटमध्येआल्या नंतर प्रसन्न व समाधान वाटले पाहिजे. असे मत श्री पोतदार सर व तुषार भाऊ यांनी व्यक्त केली. तुषार भाऊ गोरे, पोतदार साहेब हे या परिसरातील मनमिळाऊ,शांत सर्वांना वेळ प्रसंगानुसार मदत करणारे उद्योजक म्हणुन ओळखले जातात. मराठी उद्योजक हॉटेलिंग व्यवसायात तयार होत आहेत यशस्वी होत आहेत याचे आम्हाला समाधान वाटत आहे अशी भावना राष्ट्रीय धर्म हिंदू संघटनेचे, संघटन मंत्री, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री हंसराज पाटील यांनी व्यक्त केली.




# अलिबाग तालुक्यातील कुलाबा किल्ल्यात आज माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा..**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील समुद्रातील कुलाबा किल्ल्यात पुरातन श्रीसिद्धिविनायक मंदिरात गणेश जयंतीनिमित्त आज (1 फेब्रुवारी) माघी गणेशोत्सव साजरा होत आहे. कुलाबा किल्ला सार्वजिक गणेशोत्सव समितीसह अलिबागमधील गणेशभक्तांतर्फे गणेशोत्सवासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. दिवसभरात सुमारे 50 ते 52 हजाराहून अधिक भाविक येथील श्रीसिद्धिविनायकाचे गणपती बाप्पाचे दर्शन घेतात. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आंग्रेकालीन पुरातन 'गणेश पंचायतन' मंदिर अलिबागच्या समुद्रातील कुलाबा किल्ल्यात आहे. किल्ल्यातील पोखरणीच्या (तलावाच्या) पश्चिमेस हे गणेश मंदिर आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात मध्यभागी दगडी चौथऱ्यावर उजव्या सोंडेचा श्री सिद्धिविनायक गणपती, पुढील बाजूस डावीकडे 'सांब'



तर उजवीकडे 'विष्णू' आणि मागील बाजूस डावीकडे 'सूर्य' तर उजवीकडे 'देवी' अशा एकूण पाच मूर्तीच्या या समूहास गणेश पंचायतन असे संबोधले जाते. संपूर्ण काळ्या दगडातील हे मंदिर थोरल्या राघोजी आंग्रे यांनी बांधले. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस कार्तिकस्वामी व उजव्या बाजूस गणपतीची प्रतिमा आहे. मंदिराचे सभागृहसुद्धा अष्टकोनी आहे खूपच सुंदर दिसत अलिबागच्या समुद्रातील कुलाबा किल्ल्यातील आंग्रेकालीन गणेश पंचायत मंदिरात माघ शुद्ध विनायकी चतुर्थी श्री गणेश जयंती माघी गणेशोत्सवाच्या निमीत्ताने गणपती बाप्पाच्या दर्शनाकरिता भक्तांचा जनसागर उसळतो. राज्यातील या एकमेव गणेशपंचायतनाच्या दर्शनाकरीता माघी गणेशोत्सवात राज्यातील विविध जिल्ह्यातून गणेशभक्त मोठ्या प्रमाणात येत असतात. कुलाबा किल्ला सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने प्रतिवर्षीप्रमाणे गणेशोत्सवाचे अप्रतीम आयोजन केले आहे नवसाला पावणारे आणि मनोकामना पूर्ण करणारे हे गणेश पंचायतन असल्याची मोठी श्रद्धा भाविकांमध्ये असल्याने राज्यभरातून भाविक दर्शनाकरिता येत असतात दर्शनाच्यावेळी भावीकांची लहान मूल, जेष्ठ लोकं,महीला कोणतीही अडचण होवू नये तसेच दर्शन देखील शांतपणे घेता यावे याकरिता भाविकांच्या रांगांकरिता विशेष नियोजन करण्यात येते. रांगेतून आलेल्या भावीकांना थेट गणेश गाभाऱ्यापर्यंत पोहोचून थेट दर्शन घेता येईल तसेच प्रदक्षिणे अंती थेट महाप्रसाद घेण्याकरीता महाप्रसाद मंडपात पोहोचता येईल याकरिता एका तात्पूर्त्या पूलाची उभारणी करण्यात येते. माघी गणेशोत्सवाच्या दिवशी मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची गर्दी असते.किशोर अनुभवणे, सदस्य, कुलाबा किल्ला सार्वजिक गणेशोत्सव समिती.कुलाबा किल्ल्यातील गणेशोत्सवासाठी समितीमार्फत जय्यत तयारी करण्यात आली आहे. माघी गणेशोत्सवानिमित्त येथे दिवसभरात सुमारे 50 हजाराहून अधिक भाविक भेट देतात. गणेश दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विविध सुविधा तयार करण्यात आल्या आहेत. श्रीसिद्धीविनायक मंदिरात सकाळी काकडारती, अभ्यंग स्नान, अभिषेक होईल. सकाळी दहा वाजता ते दुपारी 12 वाजेपर्यंत कीर्तन व दुपारी 12 वाजून 48 मिनिटांनी गणेश जन्मोत्सव झाला गणपती बाप्पा मोरया.

## पनवेल मध्ये उबाटा गटाला खिंडार ; महानगर संघटक डीएन मिश्रा शिवसेनेत दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पनवेल महानगर संघटक डीएन मिश्रा व पनवेल मधील मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक विनोद साबळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आपल्या शेकडो समर्थकासह शिवसेनेत प्रवेश केला. खासदार श्रीरंग बारणे, जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी त्यांचे स्वागत केले. या प्रवेशामुळे पनवेल शिवसेनेला बळकटी मिळणार असल्याचे उदगार शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी काढले. मागे झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेला घवघवीत यश प्राप्त केले. त्या अनुषंगाने पनवेल मधील लहान मोठ्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा कल वाढला आहे. पनवेलचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एका वर्षामध्ये जवळपास 25 पेक्षा जास्त प्रवेश घडवून आणले आहेत.येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था व महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल मध्ये झालेले प्रवेश शिवसे शिवसेनेला नक्की बळकटी देतील असा विश्वास डीएन मिश्रा व विनोद साबळे यांच्या प्रवेशावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलून दाखवला. सकल मराठा समाज रायगडचे समन्वयक व पनवेलचे मराठा समाजाचे नेते विनोद साबळे यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केल्याने पनवेल मध्ये शिवसेनेला दुहेरी बळ आल्याचे रामदास शेवाळे यांनी सांगितले. या वेळी संपर्कप्रमुख राजेंद्र यादव तालुका प्रमुख रुपेश ठोंबरे, खांदा कॉलनी शहर प्रमुख शिवाजी थोरवे,कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, कामोठे शहर प्रमुख सुनील गोवारी, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब अदी उपस्थित होते. मिश्रा व साबळे यांच्यासह विकास मिश्रा विभाग प्रमुख पनवेल, सविंदर सिंग विंडर-उप शहर प्रमुख तळोजा, रविंदर शुक्ला, अमितेश मिश्रा, बहाल सिंग बल, प्रविण पथिस, संकेत गोंधळी,मिरेंद्र शहारे, कमलाकर लबडे, मारुती पाटील,ज्वालासिंग देशमुख, सचिन कदम,दिनेश धामनस्कर, शुभम धारेराव, प्रल्हाद कुंभार, निवृत्ती मालुसरे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला. प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांना आपल्या पक्षामध्ये सन्मान केला जाईल. त्यांना जबाबदाऱ्या सुद्धा दिल्या जातील अशी गावी ग्वाही यावेळी जिल्हाप्रमुखांनी दिली.

## झी स्टुडिओज् प्रस्तुत 'आता थांबायचं नाय!' चे दमदार टायटल पोस्टर लाँच!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, १ फेब्रुवारी (मनोरंजन प्रतिनिधी) :**

महाराष्ट्राच्या मातीतील एका प्रेरणादायी सत्यकथेवर आधारित 'झी स्टुडिओज्', 'चॉक अँड चीज फिल्म्स' आणि 'फिल्म जॅझ' निर्मित 'आता थांबायचं नाय!' हा महत्त्वाकांक्षी चित्रपट १ मे पासून संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. वेगवान रस्त्यावरील एका भिंतीवर तीन ठसठशीत रंगांत लिहिलेले 'आता थांबायचं नाय!' हे शीर्षक लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच स्फूर्ती देते. या प्रदर्शित झालेल्या मोशन पोस्टरमधून ऐकू येणारे जादुई संगीत रसिकांना मंत्रमुग्ध करत कमालीचे आकर्षण तयार करीत आहे. दर्जेदार मराठी चित्रपट महाराष्ट्रातील रसिकांच्या मनामनात आणि घराघरात रुजवणाऱ्या 'झी स्टुडिओज्'ची प्रस्तुती असलेली ही, या वर्षातील सर्वात मोठी घोषणा, 'झी स्टुडीओज् मराठी'चे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनी नुकतीच केली. 'झी स्टुडीओज्', 'चॉक अँड चीज फिल्म्स' आणि 'फिल्म जॅझ' निर्मित 'आता थांबायचं नाय!' या चित्रपटाचे दिग्दर्शन लोकप्रिय अभिनेते शिवराज वायचळ यांनी केले आहे. प्रेरणादायी सत्यकथेवर आधारित असलेल्या या चित्रपटात प्रमुख भुमिकांमध्ये लोकप्रिय अभिनेते भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, ओम भुतकर, श्रीकांत यादव, पर्ण पेठे, प्रवीणकुमार डाळिंबकर, प्राजक्ता हनमघर, किरण खोजे तसेच एका खास भूमिकेत रोहिणी हट्टंगडी आणि एका कर्तबगार, संवेदनशील अधिकाऱ्याच्या भूमिकेत आशुतोष गोवारीकर यांना आपण पाहणार आहोत. 'झी स्टुडिओज्' प्रस्तुत 'आता थांबायचं नाय!' या चित्रपटाचे लेखन शिवराज वायचळ, ओमकार गोखले आणि अरविंद जगताप यांनी केले असून या चित्रपटाच्या निर्मितीसाठी निर्माते उमेश के बन्सल(झी स्टुडिओज्), निधी परमार - हिरानंदानी(चॉक अँड चीज फिल्म्स'), क्रिएटिव्ह प्रोड्युसर - तुषार हिरानंदानी, धरम वालीया(फिल्म जॅझ) हे सर्व एकत्र आले आहेत. 'आता थांबायचं नाय!' ही सकारात्मक ऊर्जा घेऊन येणारी सत्यकथा पाहण्यासाठी संपूर्ण कुटुंबासह १ मे पासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊया आणि या प्रेरणादायी प्रवासाचे साक्षीदार होऊया!




***जनसंपर्क प्रमुख :* राम कोंडू कोंडीलकर**

## पत्रकार हमीदखान पठाण यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल परिषदेच्या वतीने पाटोदा येथे सत्कार संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सेलू येथे आदर्श तालुका आणि आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कारांचे वितरण होणार आहे. त्या निमित्त पुणे ते सेलू अशी पत्रकार एकता रॅली काढण्यात आली आहे. या वेळी रॅली पाटोदा येथे आली असता परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख सर सह वरिष्ठांच्या वतीने हमीदखान पठाण यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. या रॅलीत रांजणगाव, नगर, आष्टी, जामखेड, मार्गे पाटोदा येथे आल्यानंतर शासकीय विश्रामगृहात परिषदेचे विश्वस्त एस.एम देशमुख यांच्या सह येणाऱ्या पाहुण्यांचे



जोरदार स्वागत करण्यात आले. या वेळी मराठी पत्रकार परिषदेचे पाटोदा तालुका सचिव हमीदखान पठाण यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख, परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पाबळे, सुनिल लोणकर जिल्हाध्यक्ष पुणे, गणेश मोकाशे उपाध्यक्ष परिषद, सुनिल वाळुंज, तात्या भरत निगडे प्रसिध्दी प्रमुख, तात्या शेलार परिषद प्रतिनिधी, अनिल वडघुले अध्यक्ष पिंपरी चिंचवड, विनय सोनवणे डिजिटल मिडिया अध्यक्ष पुणे, अविनाश आदक कार्याध्यक्ष पिंपरी चिंचवड, यांच्या वतीने सत्कार करण्यात आले. या वेळी जेष्ठ पत्रकार कादर मकराणी, इद्रिस चाऊस, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, किसान सेलचे जेष्ठ नेते का.महादेव नागरगोजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, डॉ.नरेंद्र जावळे तालुकाध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पाटोदा, समता परिषद तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे, शेख फय्याज सर, शेख मोहसिन भाऊ यांच्या सह मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## रिसोड येथे श्रामणेर शिबिरांचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधि. रिसोड. रणजीत सिंह ठाकुर..**

**रिसोड** : भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद.भीमराव यशवंतराव आंबेडकर साहेब यांच्या आदेशानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची धम्म क्रांती गतिमान करण्या साठी विविध प्रकारचे संस्कार शिबीर घ्या या नुसार भारतीय बौद्ध महासभा रिसोड शाखेच्या वतिने जिल्हाध्यक्ष सिध्दार्थ भगत यांच्या मार्गदर्शत संबोधी बुद्ध विहार एकता नगर,दहा दिवसीय श्रामणेर श्रामणेरांचे उद्घाटन तालुकाध्यक्ष शालिग्राम पठाडे यांच्या हस्ते झाले, दहा दिवसीय श्रामणेर शिबीरांचे अध्यक्ष भगवान जाधव, . संघनायक पुज्य. भंते महेंद्र बोधी, केंद्रीय शिक्षक देवानंद वानखेडे नागपुर नियोजित आहेत. या शिबिरात भगवान बुद्ध, धम्म, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ,इत्यादी विषय शिकवल्या जाणार आहेत. या वेळी उपस्थित देवानंद वाकोडे जिल्हा सरचिटणीस, संध्याताई पंडित विभागीय संघटिका मंदाताई वाघमारे,प्रमिलाताई शेवाळे, महानंदाताई वाठोरे, देविदास सोनुने, रामजी बानकर, माधव हिवाळे, भिवाजी खंडारे ,संजय मैंदकर मीनाताई चव्हाण, प्रा दामोदर धांडे, प्रा. जयवंतराव हेलोडे, कैलास सुर्वे या शिबीरा करिता निवास मंदाताई उत्तम धांडे यांनी दिले.

## प्रेम संबंधातून 22 वर्षीय तरुणीची हत्या, आरोपीने स्वत:वर देखील केले वार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : प्रेम संबंधातून 22 वर्षीय तरुणीची हत्या केल्याचा प्रकार नवीन पनवेल, सेक्टर 18 येथे उघडकीस आला. त्यानंतर आरोपीने स्वतःवर देखील वार केले. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला. आरोपीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार यातील हत्या झालेल्या तरुणीचे नाव जागृती हरेश सत्वे (राहणार ज्योती अपा. सेक्टर 18, नवीन पनवेल) असे असून आरोपी निकेश शिंदे (25, रा. दिवेगाव, ठाणे) याच्यासोबत तिचे प्रेम संबंध होते. तीन महिन्यांपूर्वी त्यांचे ब्रेकअप झाले आणि जागृतीचे दुसऱ्या मुलासोबत प्रेम संबंध असल्याच्या संशयावरून निकेश शिंदे हा 31 जानेवारीला तिच्या घरी गेला आणि दुसऱ्यासोबत संबंध ठेवू नकोस असे बोलून तिच्याशी वादविवाद करून शिवीगाळ आणि हाताने मारहाण केली. यावेळी तिच्या घरी आई आणि तिची बहीण देखील होती. संध्याकाळी पावणे सहा ते साडेसहाच्या दरम्यान आरोपीने जागृती सत्वे हिच्या गळ्यावर चाकूने वार केले. त्यानंतर स्वतःच्या हातावर आणि गळ्यावर देखील वार केले. या हल्ल्यात जागृती सत्वे हिचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला. सध्या आरोपीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## जिप्सी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आर्य वैश्य महासभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** जिप्सी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आर्य वैश्य कार्यकारिणीचा व जिल्हा उपाध्यक्ष CAIT चा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. आर्य वैश्य महासभेचे राज्य उपाध्यक्ष नंदकुमार मडगुलवार राज्य कार्यकारिणी सदस्य राम पत्तेवार विलास कोडगिरे व उत्तम अण्णा चौधरी जिल्हा उपाध्यक्ष CAIT नांदेड, शिक्षक नेते प्रमोद पाटील यांचा सत्कार शाल श्रीफळ देऊन करण्यात आला आहे या कार्यक्रमात जिप्सी मॉर्निंग ग्रुपच्या अध्यक्ष जय जोशी, सचिव बालाजी तलवारे, दादारावजी आगलावे, बलभीम शेंडगे, वैजनाथ दमकुंडवार, व जिप्सी चे सर्व सदस्य उपस्थित होते भाषण करते वेळेस मी म्हणालो की शहराला आग लागल्यानंतर चिमणी आपल्या चोंची मध्ये मध्ये पाणी घेऊन आग विझवत होती. कावळा म्हणाला एवढ्या पाण्याने काय होईल तर चिमणी म्हणाली जेव्हा शहराच्या आगीवर पुस्तक लिहिण्यात येईल त्यावेळेस माझे नाव आग विझवण्याच्या लिस्टमध्ये येईल आग लावणाऱ्या च्या लिस्टमध्ये माझे नाव येणार नाही याचप्रमाणे आपण सर्वजण सामाजिक कार्यात थोडाफार भाग घेऊन जर मदत केली तर भारत देश जगात नंबर एक होईल. कार्यक्रमाच्या माध्यमातून आयकावयात आले आहे




## रामानंदाचार्यजी यांची 725 वी जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल : वार्ताहर**

.वैष्णव समाज (चतुः संप्रदाय) नवी मुंबई, रायगड यांच्यातर्फे रामानंदाचार्यजी यांची 725 वी जयंती महोत्सव आणि द्वितीय स्नेहसंमेलन साजरा करण्यात आला. 725 वा रामानंदाचार्य जी यांचा जयंती उत्सव व दुसरे स्नेहसंमेलन करंजाडे येथील श्री काळभैरव मंदिराच्या सभागृहात वैष्णव समाज चतुःसंप्रदाय, नवी मुंबई यांच्या वतीने साजरे करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी श्री रामानंद चार्यजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून आशीर्वाद घेतले, यामध्ये कलाकारांच्या भजन नृत्य व संगीताचाही लोकांनी आनंद घेतला. या कार्यक्रमासोबतच आलेल्या पाहुण्यांचा सत्कार व स्वागत करण्यात आले, तर समाजसेवक कांतीलाल वैष्णव यांच्या हस्ते भोजन प्रसादाची व्यवस्था करण्यात आली. यावेळी कांतीलाल वैष्णव, घनश्याम वैष्णव, मनोहर दास वैष्णव, दिनेश जी, अशोक वैष्णव, सुरेश दास, मनोहर दास वैष्णव, विनोद वैष्णव, चंपालाल, सालुदास, मदनदास, तुलसीदास, हरीश वैष्णव, कांतीलाल वैष्णव, संजीव स्वामी, कपूर रामावत, भवरदास रामावत यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.




## ..चिंकुद्रा येथील श्री.भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचे कु.आरती महादेव गंजे द्वितीय क्रमांक..

**दैनिक युवक आधार -.**
**-संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

तुळजापूर तालुक्यातील चिंकुद्रा येथील श्री.भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.आरती महादेव गंजे या मुलीने कौशल्य रोजगार उद्योजकला व नाविन्याता विभाग आणि शालेय शिक्षण क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मॉडेल करिअर सेंटर धाराशिव आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथे पंडित दीनदयाल उपाध्य रोजगार करिअर व व्यवसाय मार्गदर्शन मिळावा संपन्न झाला यावेळी महावाचन उत्सव जिल्हा पुरस्कार नवोपक्रम विजेते शिक्षण व साहित्यिक शिक्षण सन्मान सोहळा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव येथे उमरगा तालुक्याचे लोकप्रिय आमदार श्री.प्रवीण स्वामी (गुरुजी) यांच्या अध्यक्षतेखाली व शिक्षणाधिकारी मा. श्रीमती सुभा साळुंखे मॅडम प्राचार्य डॉ. दयानंद जटनूरे सर जिल्हा माहिती अधिकारी मा.विवेक खडसे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त मा.संजय गुरव यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला याप्रसंगी चिंकुद्रा येथील श्री. भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थीनी कु.आरती महादेव गंजे यांनी जिल्हास्तरीय महावाचन स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला



## सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती व सोमनाथ गायकवाड सामाजिक प्रतिष्ठान तर्फे पुरस्कार जाहीर.

**दैनिक युवक आधार.**
**मुकुंद कांबळे सहसंपादक. ...**

माननीय प्राध्यापक,जगन्नाथ रासवे सरांना महाराष्ट्र राज्यस्तरीय पुरस्कार साने गुरुजी राष्ट्र प्रेरणा पुरस्कार जाहीर झालेला आहे. हा पुरस्कार 2 फेब्रुवारी 2025 रोजी सायंकाळी मुंबई येथे 5 वाजून 30 मिनिटांनी प्राध्यापक जगन्नाथ तुकाराम रासवे सरांना बहाल करण्यात येणार आहे. जगनाथ रासवे सरांनी समाजातील विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य हाती घेतले आहे. जसा एक मूर्तिकार दगडाला आकार देऊन मूर्ती घडवण्याचं काम करतो. तसेच आपले जगन्नाथ रासवे सर विद्यार्थ्यांच्या आयुष्यात त्यांच्या जीवनाला आकार देण्याचे कार्य करत आहे. रासवे सरांचा ठसा हा समाजसेवा शैक्षणिक क्षेत्र पत्रकारिते मधून कार्य करताना करताना समाजाला न्याय देण्याचे कार्य सुद्धा वाकण्याजोगे आहे.श्री संगमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री माऊली कौशल्य विकास संस्था सावरगाव व श्री माऊली कौशल्य विकास संस्था आष्टी तालुका परतुर जिल्हा जालना या संस्थेतून आतापर्यंत सुमारे 2000 विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडले आतापर्यंत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका, भूमी अभिलेख कार्यालय, रेल्वे विभाग, इरिगेशन या ऑर्गनायझेशन मध्ये शासकीय सेवेत आतापर्यंत 300 विद्यार्थ्यांना शासकीय सेवेची संधी प्रदान झाली. गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर म्हणून सुमारे 200 विद्यार्थी लायसनधारक झाले. कृषी कंपनीमध्ये सुमारे 200 विद्यार्थी यांना रोजगाराची संधी



उपलब्ध झाली. महावितरण व महापारेषण कंपनीमध्ये साठ विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. पत्रकारिता क्षेत्रामध्ये सुमारे 200 विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेऊन अधिकृत पत्रकार डिप्लोमा कोर्स पूर्ण करून विविध चॅनलमध्ये, वर्तमानपत्रांमध्ये रिपोर्टर म्हणून, काही विद्यार्थ्यांनी अँकर म्हणून, काही विद्यार्थ्यांनी स्वतःचे न्यूज पेपर स्वतःचे यूट्यूब चैनल स्वतःचे पोर्टल रजिस्ट्रेशन करून राष्ट्राच्या लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्याचे काम आज करत आहे व बऱ्याच प्रशिक्षित पत्रकारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत. सुमारे 100 विद्यार्थ्यांनी क्रॉप टीचर चा डिप्लोमा घेऊन विविध शाळेत कला टीचर म्हणून कार्यरत आहे. प्राध्यापक जगन्नाथ तुकाराम रासवे समाजसेवा करताना खाली संस्थेवर कार्यरत असून संस्थेच्या माध्यमातून सुद्धा समाजसेवेचा वसा पुढे चालू ठेवला आहे. संस्थापक अध्यक्ष प्राचार्य जगन्नाथ तुकाराम रासवे *दैनिक युवक आधार मराठवाडा विभागीय संपादक *माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र संघटक *कौशल्य विकास फेडरेशन महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष *सुकाणू समिती महाराष्ट्र राज्य सदस्य *जालना जिल्हा कौशल्य जिल्हाध्यक्ष *अखिल भारतीय माळी महासंघ प्राध्यापक आघाडी मराठवाडा कार्याध्यक्ष *अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद परतुर तालुका अध्यक्ष *शिक्षक परिषद परतुर तालुका अध्यक्ष *श्री माऊली कौशल्य विकास संस्था संस्थापक अध्यक्ष इतर संस्थेमध्ये समाजसेवेचे कार्य करत आहेत. म्हणून सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती व सोमनाथ गायकवाड सामाजिक प्रतिष्ठान तर्फे प्राध्यापक जगन्नाथ तुकाराम रासवे सरांना साने गुरुजी राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आले.

## दिवसाचा मेळ, ठरला वेळ, रात्रीचा खेळ!

### अवैध रेतीचे टिप्पर चालतात रातभर ; शासनाला लाखो रुपयाचा चुना. / 'भगवानच्या' टिप्परवर विषेश आशीर्वाद..!

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग**

**प्रमुख -राजु शिंदे... :** राज्यात रेती उत्खननास बंदी असताना मंठा तळणी या भागातून रेती साठा असलेला रेती माफिया रात्रीच्या वेळी लोणार वरून रिसोड शहरासह तालुक्यात रेती माफिया खुलेआम करत असल्याचे दिसत आहे. रेती माफिया दिवसाचा करतात मेळ रात्रीचा चालतो खेळ रेती टिप्पर चालत आहे. महसुल विभागाचे याकडे अर्थपुर्ण दुर्लक्ष आहे. तालुक्यात छुप्या मार्गाने अवैधरित्या रेती वाहतूक मोठ्या प्रमाणात रात्री आकरा वाजता पासून सकाळी सहा पर्यंत शासनाच्या डोळ्यात चटणी टाकून खुलेआम रेती माफिया अवैध रेती वाहतूक करत आहे.जालना जिल्ह्यातील तळणी मंठा या भागात साठा असलेल्या रेती घाटा वरून बुलढाणा जिल्ह्यातून लोणार मार्गे रात्रीच्या वेळी चोर रस्ता मार्गाने वाशिम जिल्ह्यासह रिसोड व लोणार तालुक्यात पांगारा डोळे,देऊळ गाव वायासा, लोणी मोप या रस्त्याने रेती माफिया रेती अवैध वाहतूक सुरु असल्याचे दिसत आहे दर दिवसाला रात्रीच्या वेळेस असंख्य ब्रास रेती तस्करी



***मिळते लोकेशन, होत नाही अक्शन***
लोणार परिसरात एक, दोन नाही तर चक्क पाच अवैद्य रेती वाहतूक करणारे रेती टिप्पर लोणार महसूल विभागाने रात्रीच्या वेळी पकडले होते परंतु महसूल विभागाच्या रेती पथक मधील अधिकारी मंडळ अधिकारी नायब तहसीलदार अधिकाऱ्याच्या बोलण्यावरून चक्क पाचही रेती टिप्पर सोडण्यात आले संपूर्ण लोकेशन असून महसूल विभागाच्या अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून आर्थिक पोटी नाही झाली पाच ही रेती टिप्परवर कारवाईची अक्शन झाली नाही. लोणार व रिसोडमध्ये रात्रीच्या वेळी अवैध रेतीच्या टिप्परचा गजर रात्रभर चालू असून महसुल विभागाच्या आर्थिक धाग्यादोऱ्यामुळे त्यांच्यावर कारवाईची नजर पडत नाही.

होत असून शासकीय तिजोरीला लाखो रुपयांचा डल्ला बसत आहे महसूल विभागाच्या स्थानिक अधिकारीच्या अर्थपुर्वक दुर्लक्ष पणामुळे रिसोड व लोणार

***भगवानचा टिप्परवर विषेश आशीर्वाद***
जालना जिल्ह्यातील मंठा तळणी येथे रेती साठा दर दिवसाला 'भगवानच्या' नावाच्या टिप्पर शेकडो ब्रास रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परवर रिसोड व लोणार महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने तिजोरीला दर दिवसाला लाखो रुपयाचा बसत असून वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बोलण्यावरून दर दिवसाला रात्रीच्या अंधारात सोडले जात असल्याची चर्चा महसूल विभागातील कनिष्ठ वरिष्ठ अधिकाऱ्यांच्यासह कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा रंगत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे रेतीची तस्करी करणारे यांनी चक्क महसूल विभागाला गुंगारा देत नवीनच रस्ता केला आहे. तळणीवरून लोणार तालुक्यातील पांग्रा डोळे मार्गे गोत्रा ते देऊगाव वायासा,लोणी रिसोड व लोणार तालुक्यात भगवान नावाचा रेतीचा टिपर चा बोलबाला आहे.

शहरासह तालुक्यात रेती दलाला मार्फत खुल्या दिवसाचा खेळ अन रात्रीचा मेळ होत असल्याचे दिसून येत आहे अवैध। रेती दलाल गेल्या अनेक महिन्यापासून अवैध रित्या तस्करी करताना शहरासह तालुक्यात धुमाकूळ घातला आहे. अवैध रेती तस्करी करून महसूल विभागाच्या नाकावर खेचून लाखो रुपयांचा चुना लावण्याचे काम अवैधरीती तस्करी दलाल करताना दिसत आहे दिवसाचा मेळ आणि रात्रीचा खेळ अशाच प्रकारे सुरू असलेल्या अवैध्य रेती माफिया यांना नाही कोणाची भीती, हेच अधिकाऱ्याची साथी महसूल विभाच्या अधिकारीची आर्थिक देवाण- घेवाण झाली असल्याचे शहरासह तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे.महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने निर्माण करत आहे.

## भारज बुद्रुक येथ गणेश जयंती निमित्त भव्य दिव्य रौप्य महोत्सवास उत्साहात सांगता

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः ज्ञानेश्वर निकाळजे**
**वरूड (सर्कल)**

माग महिन्यात येणाऱ्या गणेश जयंतीची उत्सव श्री सिद्धिविनायक गणपती संस्थांच्या वतीने विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केला असून भव्य दिव्य रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला आज दिनांक १ फेब्रुवारी रोजी भारत बुद्रुक नगरीतून भव्य अशी श्री सिद्धिविनायकाची शोभ यात्रा काढून महाप्रसादाचे वितरण करून या उत्साहाची सांगता करण्यात आली गणेश जयंती निमित्त श्री सिद्धिविनायक संस्थांच्या वतीने भव्य दिव्य रौप्य महोत्सव भजन , कीर्तन , प्रवचन , या सह विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते २६ जानेवारी पासून या उत्सवाला प्रारंभ झाला होता १ फेब्रुवारी रोजी सकाळी श्री गणेश सिद्धिविनायक मूर्तीला अभिषेक व महाआरती संपन्न झाल्यावर पालखीला सुरुवात करण्यात आली यामध्ये भजनी मंडळ झेंडेकरी महिला व पुरुष भक्त यांच्यासह श्री सिद्धिविनायक पालखीचे वाजत गाजत भव्य श्री सिद्धिविनायकाची पालखी मिरवणूक काढण्यात आली ठिकठिकाणी महिलांनी या भव्य अशा पालखीसाठी सडा व रांगोळी काढून तसेच पुष्पवृष्टी करून उत्साहात सांगता करण्यात आली



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# क्रीडा व युवाविषयक बजेटमध्ये ३५० कोटींची वाढ

## 'खेलो इंडिया'चा सर्वाधिक वाटा

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात क्रीडा व युवा विषयक मंत्रालयाच्या निधीत ३५१.९८ कोटींची वाढ करण्यात आली आहे. 'खेलो इंडिया' हा कार्यक्रम सर्वाधिक लाभार्थी ठरला आहे. महत्त्वाकांक्षी 'खेलो इंडिया' योजनेसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता १,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. २०२४-२५ मधील ८०० कोटींच्या तुलनेत ती २०० कोटींनी अधिक आहे. एकूणच, युवा कार्य व क्रीडा मंत्रालयासाठी ३,७९४.३० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

येत्या वर्षात ऑलिम्पिक, राष्ट्रकुल किंवा आशियाई क्रीडा स्पर्धांसारखी कोणतीही मोठी स्पर्धा नाही. त्यामुळे अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी केलेली वाढ महत्त्वाची मानली जात आहे. राष्ट्रीय क्रीडा महासंघांसाठी दिल्या जाणाऱ्या सहाय्यातही ३४० कोटींवरून ४०० कोटींपर्यंत वाढ करण्यात आली आहे. भारतीय क्रीडा प्राधिकरणासाठी (साई) २०२४-२५ च्या ८१५ कोटींवरून ८३० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.




### डोप चाचणीसाठी निधीत वाढ

राष्ट्रीय डोप चाचणी प्रयोगशाळेसाठी २३ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय डोप चाचणी प्रयोगशाळेसाठी १८.७० कोटींची तरतूद करण्यात आली होती. मात्र आता त्यात ४.३० कोटींची वाढ करण्यात आली आहे. राष्ट्रीय अँटी-डोपिंग एजन्सीच्या निधीतही वाढ करण्यात आली असून, तो २०.३० कोटींवरून २४.३० कोटींवर नेण्यात आला आहे.

### युवा आणि प्रादेशिक क्रीडा कार्यक्रमांसाठी निधीतील बदल

युवा व किशोरवयीन विकास कार्यक्रम आणि युवा वसतिगृह योजनांच्या अनुदानात कपात करण्यात आली आहे. तथापि, बहुपक्षीय संस्था व युवा विनिमय कार्यक्रमांसाठी निधी ११.७० कोटींवरून ५५ कोटींवर वाढवण्यात आला आहे.

### जम्मू-काश्मीरमधील क्रीडा सुविधांचा विकास

जम्मू-काश्मीरमधील क्रीडा सुविधांच्या सुधारणेसाठी २० कोटींची मंजुरी देण्यात आली आहे. मागील वर्षाच्या ६ कोटींच्या तुलनेत यंदा त्यात १४ कोटींची वाढ केली आहे.

### राष्ट्रीय सेवा योजनेसाठी मोठा निधी

राष्ट्रीय सेवा योजनेसाठी ४५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या २५० कोटींपेक्षा तो यंदा २०० कोटींनी अधिक आहे.

# मुंबईचा मेघालयवर दणदणीत विजय

## बाद फेरीसाठी स्थान मजबूत

**मुंबई :** जम्मू-काश्मीरविरुद्ध पराभव पत्करल्यानंतर मुंबईने शनिवारी मेघालयवर दणदणीत विजय मिळवला.

शार्दूल ठाकूर आणि तनुष कोटियन यांच्या भेदक गोलंदाजीच्या (प्रत्येकी ४ विकेट) बळावर मुंबईने मेघालयविरुद्ध डाव आणि ४५६ धावांनी सरशी साधली. या कामगिरीमुळे रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या 'ए' गटात मुंबईने अव्वल स्थानी झेप घेतली आहे. गत विजेता मुंबई आणि जम्मू-काश्मीर या दोन्ही संघांच्या खात्यात समसमान २९ गुण आहेत. मात्र मुंबईचा रन रेट १.७४ आणि जम्मू-काश्मीरचा रनरेट १.५९ इतका आहे.

**रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा**

दरम्यान, जम्मू-काश्मीरचा सामना बडोद्याविरुद्ध सुरू आहे. या सामन्यात तो संघ किमान तीन गुण मिळवण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास जम्मू-काश्मीरचा संघ गटातील टॉपर म्हणून लीग फेरी संपवू शकतो.

पहिल्या डावात ५८५ धावांनी पिछाडीवर पडलेल्या मेघायलाच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावातही निराश केले. दुसऱ्या डावात पाहुणा संघ अवघ्या १२९ धावांवर आटोपला. शार्दूल ठाकूरने ४८ धावा देत ४ फलंदाज बाद केले. तर कोटियनने १५ धावा देत ४ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला.

मेघालयचा पहिला डावही स्वस्तात आटोपला होता. पहिल्या डावात त्यांना अवघ्या ८६ धावा जमवता आल्या होत्या. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या मुंबईच्या संघाने ७ फलंदाज गमावून ६७१ धावांवर आपला डाव घोषित केला होता. त्यामुळे मुंबईच्या संघाने विजयासह बोनस गुण मिळवले.

रणजी ट्रॉफीच्या इतिहासात मुंबईने डावासह सर्वाधिक धावांनी मिळवलेला हा विजय आहे. या मोठ्या विजयामुळे उपांत्य फेरीतील मुंबईच्या प्रवेशाची शक्यता अधिक आहे. ८ फेब्रुवारीपासून उपांत्य फेरीच्या सामन्याला सुरुवात होणार आहे.




शनिवारी २९ धावांवर २ फलंदाज बाद येथून खेळताना तिसऱ्या दिवसाच्या पहिल्या सेशनमध्ये मुंबईने उर्वरित ८ विकेट घेतले. किशन लिंडोह (३९ धावा) आणि अनिरुद्ध बी (२४ धावा) यांनी मेघालयतर्फे झुंजार खेळी खेळली. मात्र संघाचा पराभव वाचवण्यात ती पुरेशी नव्हती.

संक्षिप्त धावफलक : मेघालय ८६ आणि १२९ धावा (किशन लिंडोह ३९, अनिरुद्ध बी २४; शार्दुल ठाकूर ४/४८, तनूष कोटियन ४/१५) विरुद्ध मुंबई ६७१/७ घोषित. मुंबईने डाव आणि ४५६ धावांनी विजय मिळवला.

## गुजरात उपांत्यपूर्व फेरीत

**अहमदाबाद :** आर्या देसाई आणि जयमीत पटेलच्या दमदार अर्धशतकांसह फिरकीपटू सिद्धार्थ देसाईच्या प्रभावी गोलंदाजीच्या जोरावर गुजरातने रणजी ट्रॉफीच्या ब गटातील शेवटच्या सामन्यात हिमाचल प्रदेशवर नऊ विकेटने दणदणीत विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. देसाईने चार विकेट घेतल्या, तर विशाल जैस्वालने तीन आणि जयमीतने दोन बळी घेतले. त्यामुळे गुजरातने हिमाचल प्रदेशला ६२.५ षटकांत १७५ धावांत गारद केले. हिमाचलने तिसऱ्या दिवशी ६३ धावांवर दोन बाद अशी सुरुवात केली होती.

## साहाला विजयी निरोप



यष्टीरक्षक फलंदाज वृद्धीमान साहाने शनिवारी क्रिकेटच्या सर्व प्रकारांतून निवृत्ती स्वीकारली. रणजी ट्रॉफी सामन्यात पंजाबवर विजय मिळवल्यानंतर बंगालच्या खेळाडूंनी त्याला उचलून घेतले.

# पारडगाव येथील जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-** रमेश सुरशे(छत्रपती संभाजीनगर):- पारडगाव घनसावंगी तालुक्यातील पारडगाव येथील जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळेत स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे नृत्य गायन, गीत ,देशभक्ती गीत, कव्वाली ,नाटक ,बेटी पढाव बेटी बचाव, हुंडाबंदी नाटक सादर करून पालक वर्गाचे मने जिंकली जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गोरगरिबाची मुले -मुली शिक्षण घेत असतात. जिल्हा परिषद शाळेत शिक्षण काय आहे हे आज संस्कृतीत कार्यक्रमातुन विद्यार्थिनी दाखवून दिले. शाळेतील विद्यार्थ्याचे कला गुण पाहून गावातील दानशूर व्यक्ती अश्फाक पटेल यांच्याकडून पहीली ते नववीच्या विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल तसेच दोनशे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रचे वाटप मान्यवराच्या हस्ते वाटप करण्यात आले.चौथी ते नववीच्या विद्यार्थ्यांना मुज्जू पटेल यांच्याकडून परीक्षा पॅड विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.व अब्दुल करीम कुरेशी यांचेकडून अकरा ट्रॉफी देण्यात आले.सैय्यद सरफुद्दीन यांच्याकडून मंडप साऊड सर्विसची व्यवस्था करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य यांच्याकडून चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्दघाटन शिक्षण विस्तार अधिकारी बाळासाहेब सोळंके,गेनाथ साळवे,सरपंच गोरख जाधव, उपसरपंच सैय्यद शफी अहमद, ग्राम विकास अधिकारी बरीदे,मनसे जिल्हा उपाध्यक्ष विष्णू माकोडे, तंटामुक्ती अध्यक्ष गणेश सातपुते,संपादक सय्यद अकबर अली, शालेय समिती अध्यक्ष असेफ कुरेशी, उपाध्यक्ष फिरोज कुरेशी, हरुण हाफिज कुरेशी,सय्यद शेफुद्दीन,अखिल कुरेशी, शाकीर कुरेशी ,फकीरा पाखरे,सय्यद अखिल,प्रभाकर ढेरे ,पिंटू डोळझाके,नाझीर हाफेज, नासिर टेलर,सादिक शेख अब्दुल रहमान, सय्यद शमशुद्दीन,विक्रम कुरेशी, संस्कृती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सय्यद अब्दुल मुकीद सर, जावेद खान ,मोहम्मद इरफान ,मोहम्मद रियाजुद्दीन ,अंसरी शेहनाज, रुबीना सिद्दिकी ,शेख तरनुन शेख आफरीन, रवींद्र शिरसाट,यांचे सह मोठ्या प्रमाणात पालक वर्गाची महिला व गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## निवडक

### कामगार कबड्डी स्पर्धा मंगळवारपासून

**मुंबई :** औद्योगिक व व्यावसायिक कामगारांची २८ वी आणि महिलांची २३ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा मंगळवार, ४ फेब्रुवारीपासून हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी येथे सुरू होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी दुपारी ४ वाजता कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार अनिल देसाई, आमदार कालिदास कोळंबकर, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, विकास आयुक्त (असंघटित कामगार) तुकाराम मुंढे, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. दि.४ ते ७ फेब्रुवारी दरम्यान सायंकाळी ४ ते रात्री ९.३० वाजेपर्यंत स्पर्धेचे सामने होतील.

### साईराजला वेटलिफ्टिंगमध्ये कांस्य

**डेहराडून :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नाशिकच्या साईराज परदेशी याने वेटलिफ्टिंगमधील ८१ किलो गटात कांस्यकमाई केली. एका आठवड्यापूर्वी तापाने आजारी असलेल्या आणि पाठीच्या दुखण्याने त्रस्त असलेल्या साईराज या १७ वर्षीय खेळाडूने स्नॅचमध्ये १४१ किलो, तर क्लीन व जर्कमध्ये १७० किलो असे एकूण ३११ किलो वजन उचलले. मध्यप्रदेशाच्या व्ही. अजय बाबू याने ३२२ किलो, तर पश्चिम बंगालच्या अचिंता शेऊलीने ३१३ किलो वजन उचलून अनुक्रमे सुवर्णपदक व रौप्यपदकाची कमाई केली.



# कोळी-आगरी एकता संघ विजेता

**मुंबई :** फिफ्टी प्लस महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अंतर्गत तात्या प्रतिष्ठान आयोजित वाडा कुडुस, अंबाडी येथे पार पडलेल्या क्रिकेट प्रीमियम लीग २०२५ स्पर्धेत मुंबईचा कोळी-आगरी एकता समाज संघ विजेता, तर भाईंदरचा आगरी कोळी संघ उपविजेता ठरला.

**फिफ्टी प्लस क्रिकेट स्पर्धा**

नरेश माऊली यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कोळी-आगरी एकता समाज संघाने चार षटकांत ४० धावा केल्या. भाईंदरचा आगरी कोळी संघ ३२ धावांपर्यंतच पोहचू शकला.

स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज व सामनावीराचे पारितोषिक नागेश भंडारीला (कोळी आगरी), उत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिक गणेश (आगरी कोळी, भाईंदर) याला, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून राजू पाटील (आगरी-कोळी, भाईंदर) याला, मालिकावीराचे पारितोषिक सुधीर (कोळी आगरी, बोरीवली) यांना देऊन गौरविण्यात आले. विजेता, उपविजेत्या संघांला दिवाकर म्हात्रे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेत उत्कृष्ट समालोचन करणारे दिव्यांग क्रीडाप्रेमी दिनेश ठाकरे यांनाही मंडळाकडून आर्थिक मदत करण्यात आली.

# रोहित, विराट चॅम्पियन्स ट्रॉफीत महत्त्वाची भूमिका बजावणार

**मुंबई :** चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये विराट कोहली आणि रोहित शर्मा या अनुभवी खेळाडूंवर मोठी जबाबदारी असेल. ते संघात महत्त्वाची भूमिका बजावणार असे मत भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी व्यक्त केले. मुंबईत झालेल्या बीसीसीआयच्या वार्षिक पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.

गंभीर म्हणाले की, माझ्या मते, रोहित आणि विराट हे दोघेही संघाच्या ड्रेसिंग रूमसाठी खूप महत्त्वाचे आहेत. भारतीय क्रिकेटसाठीही ते खूप महत्त्वाचे आहेत. त्यांनी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये मोठी भूमिका बजावली पाहिजे. मी यापूर्वीही सांगितले आहे की, हे खेळाडू धावांसाठी अतिशय भुकेलेले आहेत. त्यांना भारताला विजय मिळवून द्यायचा आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी ही ५० षटकांच्या विश्वचषकाच्या तुलनेत पूर्णतः वेगळी स्पर्धा आहे. स्पर्धेत प्रत्येक सामना 'करो या मरो' प्रकारचा असतो. त्यामुळे या स्पर्धेत गाफील राहून चालत नाही, असे गंभीर म्हणाले. स्पर्धेत चांगली सुरुवात करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे गंभीर म्हणाले.

**गंभीर यांचे वक्तव्य**



भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढतीबाबत गंभीर म्हणाले की, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आम्ही असा विचार करून जात नाही की २३ फेब्रुवारीचा सामना आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचा आहे. मला वाटते की, पाच सामने हे सर्वच महत्त्वाचे आहेत. दुबईला जाण्याचा उद्देश केवळ एक सामना जिंकणे नाही, तर चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणे हा आहे, असे गंभीर यांनी स्पष्ट केले.

भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व करणाऱ्या सूर्यकुमार यादवचेही गंभीर यांनी कौतुक केले. कोहली, रोहित या दिग्गज खेळाडूंच्या निवृत्तीनंतर संघाला तो नव्या जोमाने पुढे नेत असल्याचे गंभीर यांनी सांगितले.

### भारत-पाक लढतीकडे सामना म्हणून पाहावे

भारत-पाकिस्तान या लढतीचा फारसा विचार न करता त्याकडे केवळ एक सामना म्हणून पाहायला हवे, असे भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा म्हणाला. गेल्या दोन-तीन वर्षांत मी याबद्दल खूप बोललो आहे. आमच्यासाठी हा फक्त एक सामना आहे. त्या दिवशी कोणत्याही क्रिकेट संघाने जसे खेळायला हवे तसेच आम्हीही खेळणार आहोत. आम्ही मैदानावर जाऊ आणि आमची सर्वोत्तम कामगिरी करणार, असे रोहित म्हणाला.

# विहंग, शिर्सेकर्स, सरस्वती, ग्रिफिन उपांत्य फेरीत



**श्री मावळी मंडळ खो-खो स्पर्धा**

**ठाणे :** श्री मावळी मंडळ संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित प्रथम विभागीय पुरुष व महिला गटाच्या खो-खो स्पर्धेत पुरुष गटात विहंग क्रीडा केंद्र (ठाणे), शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमी (मुंबई उपनगर), सरस्वती क्रीडा केंद्र (मुंबई शहर) व ग्रिफिन जिमखाना (ठाणे) या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर, महिला गटात रा. फ. नाईक संघ (ठाणे), ज्ञानविकास फाऊंडेशन संघ (ठाणे), शिवभक्त स्पोर्ट्स क्लब (ठाणे) व शिर्सेकर्स महात्मा गांधी स्पोर्ट्स अकॅडमी (मुंबई उपनगर) या संघांनी उपांत्य फेरी गाठली.

### महिलांत रा. फ. नाईक, शिवभक्तची आगेकूच

महिला गटातील पहिल्या उपउपांत्य सामन्यात ठाण्याच्या रा. फ. नाईक संघाने ठाण्याच्या राजश्री शाहू महाराज संघाचा ०८-०४ असा पराभव केला. दुसऱ्या उपउपांत्य सामन्यात ठाण्याच्या शिवभक्त स्पोर्ट्स क्लब संघाने मुंबई शहरच्या ओम साईश्वर सेवा मंडळाला ७-६ असे नमवले.

पुरुष गटातील उपउपांत्य सामन्यात विहंग क्रीडा मंडळाने मुंबई शहरच्या विद्यार्थी क्रीडा मंडळ संघाचा १०-०९ असा १ डाव १ गुणाने पराभव केला.

**पदकतालिकेत अव्वल स्थानी झेप**

# खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राने पटकावला दुहेरी मुकुट

**हल्दवणी :** ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत खो-खोच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या महिला आणि पुरुष संघांनी ओदिशाच्या दोन्ही संघांवर मात करित दुहेरी मुकुट पटकावला. महाराष्ट्राच्या महिला आणि पुरुष या दोन्ही संघांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. या विजयामुळे महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत प्रथम क्रमांकावर पोहोचले आहे.

**राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा**





उत्तराखंड येथे सुरू असलेल्या स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओदिशावर चुरशीच्या लढतीत ३ गुणांनी (३१-२८) विजय मिळवला. मध्यंतराला महाराष्ट्राकडे तीन गुणांची (१५-१२) आघाडी होती. दुसऱ्या सत्रातही ही आघाडी कायम राखण्यात महाराष्ट्राच्या संघाला यश आले. त्यामुळे हा विजय सुकर झाला. महाराष्ट्रातर्फे प्रियांका इंगळे (१.३० मि., १.५२ मि. संरक्षण आणि ४ गुण), अश्विनी शिंदे (१.२३ मि. संरक्षण व १० गुण), संध्या सुरवसे (२.२४ मि., २.२३ मि. संरक्षण व २ गुण), रेश्मा राठोड (१.११ मि., १.४५ मि. संरक्षण आणि ४ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. तर ओदिशातर्फे अर्चना प्रधान (१ मि., १.३५ मि. संरक्षण आणि ४ गुण), सुभश्री सिंग (१.८ मि. संरक्षण व ६ गुण) यांनी चांगला खेळ केला.

पुरुषांच्या गटात महाराष्ट्राने ओदिशाचा सव्वासात मिनिटे आणि ६ गुणांनी (३२-२६) पराभव केला. त्यात महाराष्ट्राच्या रामजी कश्यप (२.२० मि., १.१० मि. संरक्षण व २ गुण), सुयश गरगटे (१.१० मि. संरक्षण व ६ गुण), अनिकेत चेंदवणेकर (१ मि. व २ मि. संरक्षण), प्रतीक वायकर (१ मि. संरक्षण व ६ गुण), शुभम थोरात (१.३० मि., १.२० मि. संरक्षण आणि २ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. पराभूत संघातर्फे पाबनी साबर (१ मि. संरक्षण व ६ गुण), सुनील पात्रा (१.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला.

### आर्या-रुद्राक्ष जोडीचा रुपेरी वेध

**डेहराडून :** ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक विभागात रौप्यपदक जिंकणाऱ्या आर्या बोरसे व रुद्राक्ष पाटील या महाराष्ट्राच्या जोडीने येथे नेमबाजीमधील १० मीटर रायफल मिश्र दुहेरीत रौप्य पदक पटकाविले. महाराणा प्रताप क्रीडा संकुलातील त्रिशूल शूटिंग रेंजवर रंगलेल्या १० मीटर रायफल मिश्र दुहेरीच्या लढतीत आर्या-रुद्रांक्ष या जोडीने पंजाबच्या ओजस्वी ठाकूर व अर्जुन बबुटा या जोडीला चिवट लढत दिली. मात्र, पंजाबच्या जोडीने महाराष्ट्राच्या जोडीवर १६-१२ असा विजय संपादन केला.

## निवडक

### निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या घरी ईडीचा छापा

**भाईंदर :** भाईंदर पूर्वेच्या आरएनपी पार्क येथील कृष्णा सागर सोसायटीमध्ये राहणाऱ्या निवृत्त पोलीस अधिकाऱ्याच्या घरी ईडीने छापा टाकला आहे. दिल्ली येथील सक्त वसुली अंमलबजावणी संचालनालय (ईडी) च्या अधिकाऱ्यांनी भाईंदर पूर्वेच्या आरएनपी पार्क येथील कृष्णा सागर सोसायटीमध्ये राहणाऱ्या निवृत्त पोलीस अधिकारी प्रदीप सिंह यांच्या घरी छापा टाकला आहे. ही कारवाई नक्की कशामुळे केली, याचे अद्याप कारण स्पष्ट झालेले नाही.

### डोंबिवलीत पूर्व भागात बससेवा सुरू

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्वेकडील रुणवाल गार्डन, माय सीटी येथे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवा अंतर्गत बससेवा सुरू करण्याची मागणी रुणवाल गार्डन वसाहतीतील नागरिकांनी शिवसेना आमदार राजेश मोरे यांच्याकडे केली होती. त्याच अनुषंगाने शुक्रवारपासून रुणवाल गार्डन व माय सीटी ते डोंबिवली अशी बससेवा सुरू करण्यात आली. यावेळी कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे, शिवसेना कल्याण तालुका प्रमुख महेश पाटील, दत्ता वझे, दिनेश शिवलकर, विकी हिंगे, अवनी शर्मा, परिवहन उपक्रमाचे मार्ग तपासणीस शालिक टावरे, राजेंद्र पातकर आदींनी श्रीफळ वाढवून बस सेवेचा शुभारंभ केला. याप्रसंगी नागरिकांनी आनंद व्यक्त करत शुभेच्छा दिल्या आहेत.

### डोंबिवलीत कर्करोग विरोधात जनजागृती

**डोंबिवली :** 'अनिल कॅन्सर क्लीनिक' आणि 'गोपाळकृष्ण चॅरिटेबल ट्रस्ट'च्या माध्यमातून कर्करोग विरोधात आज जनजागृती करण्यात येणार आहे. दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता डोंबिवली पूर्वेतील मानपाडा रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते फडके रोडवरील आप्पा दातार चौकापर्यंत 'कर्करोग विरोध जनजागृती प्रभात फेरी' आयोजित करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट निबंध लिहिलेल्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात पारितोषिक वितरण करण्यात येणार असल्याची माहिती कर्करोग तज्ज्ञ डॉ. अनिल हेरूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### खानीवली आरोग्य केंद्राचे नूतनीकरण

**जव्हार :** वाडा तालुक्यातील खानीवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे नूतनीकरण नोवोनेसिस (सिनर्जिया लाइफ सायन्सेस प्रा.लि.) कंपनी आणि दिगंत स्वराज फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून या केंद्राच्या सहा कक्षांचे नूतनीकरण करण्यात आले. यामध्ये लॅब रूम, माहेरघर, इंजेक्शन रूम, टॉयलेट, मेडिसिन रूम आणि महिला वॉर्ड यांचा समावेश होता. या दुरुस्तीमुळे केंद्राची सुविधा अधिक आधुनिक व सुसज्ज बनली आहे. त्यामुळे रुग्णसेवा प्रबळ झाली असल्याने तालुक्यात समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, नोवोनेसिस कंपनीचे प्रतिनिधी संजय सूर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी असे समाजकार्य पुढेही नोवोनेसिस (सिनर्जिया लाइफ सायन्सेस प्रा.लि.) कंपनीच्या माध्यमातून सुरू राहील, असे सांगत नूतनीकरणानंतरच्या आरोग्य केंद्राच्या व्यवस्थापनासाठी सहकार्याचे वचन दिले.

# उल्हासनगर-अंबरनाथ-बदलापूरच्या संयुक्त कचरा प्रकल्पाला गती

## घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या कामाचा आयुक्तांकडून आढावा

**उल्हासनगर :** शहराचा विकास झाला तरी घनकचरा व्यवस्थापन ही मोठी समस्या ठरत आहे. प्रदूषण, दुर्गंधी आणि कचऱ्याचे वाढते प्रमाण यामुळे उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या तिन्ही शहरांतील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, आता या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात येणार आहे. अंबरनाथ तालुक्यातील वालिवली येथे सुरू असलेल्या संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या कामाला वेग मिळत असून उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी प्रत्यक्ष पाहणी करत कामाचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच एमएमआरडीएचे प्रतिनिधी आणि कंत्राटदार उपस्थित होते.



### शहर स्वच्छतेच्या दिशेने मोठी झेप

या प्रकल्पामुळे उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरमधील नागरिकांची घनकचऱ्याच्या समस्येतून सुटका होईल. प्रदूषणाचा त्रास कमी होऊन पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन प्रणाली तयार होणार आहे. तिन्ही शहरांच्या रहिवाशांना याचा मोठा फायदा होणार असून शहर अधिक सुंदर आणि राहण्यालायक होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. पालिका प्रशासनाने नागरिकांना आश्वासन दिले आहे की, लवकरच हा प्रकल्प कार्यान्वित होईल आणि शहर स्वच्छतेच्या दिशेने मोठी झेप घेईल.

या पाहणी दौऱ्यात कामाचा दर्जा, प्रकल्पाची सद्यस्थिती आणि नियोजित कालमर्यादा यासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. गेल्या काही वर्षांत उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूरमध्ये डम्पिंग ग्राऊंडमुळे प्रदूषण वाढले होते. नागरिकांनी वारंवार प्रशासन आणि राज्य शासनाकडे तक्रारी केल्यानंतर अखेर संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला मान्यता मिळाली.

राज्य शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अंतर्गत हा प्रकल्प आकारास येत आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून हा प्रकल्प ८.२ एकर जागेवर उभारला जात आहे. या अत्याधुनिक घनकचरा व्यवस्थापन योजनेमुळे तिन्ही शहरांतील कचऱ्याचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन, डम्पिंग ग्राऊंडमुळे होणारे प्रदूषण थांबविण्यास मदत, कचऱ्याचा पुनर्वापर आणि पर्यावरणपूरक प्रक्रिया, शहरात स्वच्छता आणि आरोग्य सुधारणा होणार आहे. प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेत आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी काम गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि एमएमआरडीए प्रतिनिधींशी चर्चा करून कामाच्या अडचणी जाणून घेतल्या. घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्याची गरज असल्याचे सांगितले.

# माघी गणेशोत्सवाची सर्वत्र धूम

**माघी गणेशोत्सवाचा उत्साह मोठ्या भक्तिभावाने तसेच उत्साहात साजरा केला जातो. यावेळी सगळीकडे धुमधडाक्यात गणपतीचे स्वागत केले जाते. माघी गणेश जयंतीनिमित्त मोठ्या प्रमाणात फुलांची सजावट तसेच रोषणाई केली जाते. राज्यातील सर्व गणेश मंदिरांत भाविकांनी मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळाले.**

## चिरनेरच्या महागणपती मंदिरात भक्तांची प्रचंड गर्दी



**राजकुमार भगत/ उरण**

माघी गणेशोत्सवानिमित्त शनिवारी चिरनेर येथील प्रसिद्ध महागणपती मंदिरात महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. दरवर्षी माघी गणेशोत्सवानिमित्त चिरनेर येथील प्रसिद्ध महागणपतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. चिरनेरचा महागणपती हा नवसाला पावणारा असल्याची भक्तांची भावना असल्याने मुंबई, नवी मुंबई, ठाणे व परिसरातील अनेक गणेशभक्त येथे दर्शनाला येतात. चिरनेरचे हे महागणपती मंदिर पेशवेकालीन असून पेशव्यांचे सुभेदार रामजी फडके यांच्या स्वप्नात दृष्टांत देऊन मी तळ्यात पडलेला असून माझी प्रतिष्ठापना करावी, असे सांगितले.

## देवबांधच्या माघी गणेशोत्सवाला भक्तांची मांदियाळी

**दीपक गायकवाड / मोखाडा**

मोखाडा तालुक्यातील देवबांध येथे सालाबादप्रमाणे यंदाही माघी गणेश जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी झाली आहे. यावेळी विविध ठिकाणाहून गणेशभक्तांची मांदियाळी बहुसंख्येने उपस्थित होती. यावेळी हजारो गणेशभक्तांनी विनायकाचे मनोभावे दर्शन घेतले आहे. त्यामुळे देवबांधला मोठे यात्रेचे स्वरूप आले होते.

मागील ४५ वर्षांची अव्याहत परंपरा असलेला देवबांधचा माघी गणेश जयंती उत्सव हा प्रसिद्ध आहे. गणेश जयंती उत्सवासाठी



तालुका आणि पंचक्रोषीसह ठाणे, मुंबई, डोंबिवली, नाशिक आदी शहरी भागातूनही गणेशभक्तांनी शेकडोंच्या संख्येने हजेरी लावली होती. गणेशजयंती कार्यक्रमासाठी इगतपुरी येथील भाविक मागील अनेक वर्षांपासून पायी दिंडी काढीत असून गणपती अथर्वशीर्ष व गणेशनामाचा गजर करीत देवबांध येथे दाखल होतात.

## कल्याणमध्ये तिरुपती बालाजी मंदिराचा देखावा

**शंकर जाधव/कल्याण**

कल्याण पश्चिमेतील सर्वात जुना सार्वजनिक माघी गणेशोत्सव अशी ओळख असलेल्या उंबर्डे येथील शिवप्रेमी माघी गणेशोत्सवामध्ये यंदा दक्षिणेतील श्री तिरुपती बालाजी मंदिराचा भव्य देखावा साकारण्यात येणार आहे. कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या पुढाकाराने गेल्या ३० वर्षांपासून हा माघी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या स्वरूपात तो साजरा करण्यात येणार आहे.

दिवंगत शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या उंबर्डे कोळिवली उपविभागीय शाखेतर्फे गेल्या ३ दशकांपासून हा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. स्व. आत्माराम भोईर चौकात तब्बल ७० फूट उंच आणि ६० फूट लांबीच्या आकाराचे तिरुपती बालाजी मंदिर याठिकाणी साकारण्यात आले आहे.



## श्री सिद्धिविनायक माघी उत्सवाला मोठी गर्दी

**संजय करडे/ मुरूड-जंजिरा**

नांदगावच्या माघी उत्सवाला प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे दोन वाजता मंदिराचे पुजारी विनायक जोशी, महेश जोशी, शैलेश जोशी यांनी श्रींची शोडषोपचारे पूजा केली, त्यानंतर चिटणीस गुप्ते कौटुंबिक ट्रस्टतर्फे पूजा करण्यात आली. सेवा मंडळातर्फे गणेश गाणार यांनी सपत्निक केलेल्या पूजेनंतर मंदिर भक्तांसाठी खुले करण्यात आले.

पहाटे थंडीच्या कडाक्यामुळे दर्शनासाठी भाविकांची गर्दी कमी असली तरी त्यानंतर मात्र त्यात वाढ झाली. यावेळी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुरूड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस, गृहरक्षक दल, नजीकच्याच यशवंतनगर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठे सहकार्य केले. सरकारी कार्यालये तथा शाळा महाविद्यालयांना सुट्टी नसल्याने दिवसभर गर्दी कमी असली तरी सायंकाळी त्यात मोठी वाढ झाली.

नांदगावमधील मुख्य रस्त्यांवर सतत जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांमुळे यात्रेमुळे अडथळा निर्माण होत होता. सकाळी १०.३० ते १.३० वाजेपर्यंत हभप महेश कुमार सरदेसाई (रत्नागिरी) यांनी जन्मोत्सवाचा सोहळा पार पाडला.

## पन्नास वर्षांनंतर विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**कर्जत :** अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला, कर्जत या शाळेतील जुनी अकरावी १९७५ च्या बॅचला पन्नास वर्षे झाल्याच्या निमित्ताने सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते, याप्रसंगी सर्व वर्ग मित्रांनी शाळेला भेट दिली. त्यावेळी या वर्ग मित्रांपैकी काही जण शाळा सोडल्यावर म्हणजे तब्बल पन्नास वर्षांनी पहिल्यांदाच शाळेची पायरी चढत होते. पन्नासाव्या वर्षी पन्नास वर्गमित्रांची उपस्थिती हा एक योगायोगच म्हणावा लागेल.

१९७५ साली जुन्या अकरावीत असलेल्या वर्गमित्रांचा सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळाव्याचे आयोजन मालवाडी रस्त्यावरील रॉयल कॅम्प येथे करण्यात आले होते. हे सर्व विद्यार्थी सकाळी आपल्या शाळेत जमले व शाळेचा लोगो असलेले टी-शर्ट परिधान करून शाळेला भेट दिली. संस्थेचे अध्यक्ष गणेश वैद्य यांनी उपस्थित वर्ग मित्रांचे स्वागत केले, याप्रसंगी विजय मोरे उपस्थित होते. वैद्य यांनी माजी विद्यार्थ्यांच्या समवेत शाळेच्या नवीन इमारतीची पाहणी करून आर्थिक मदतीचे आवाहन केले.

निवृत्त शिक्षिका उषा वैद्य यांच्याहस्ते दीप प्रज्वलन करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. नुकतेच दिवंगत झालेले वर्गमित्र माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड आणि वासुदेव बैलमारे तसेच शिक्षक दामोदर शहासने, जनार्दन परांजपे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## पिकअपच्या धडकेत चिमुकली ठार

**उरण :** पिकअप टेम्पो पाठीमागे घेत असताना रस्त्याच्या बाजूने आईसह चालणारी चार वर्षाची मुलगी टेम्पोच्या पाठीमागील चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी खारकोपर येथे घडली. या अपघातानंतर उलवे पोलिसांनी टेम्पोचालकाला ताब्यात घेतले आहे. नायला खान (४) असे या अपघातात मृत्यू झालेल्या मुलीचे नाव असून ती उलवे खारकोपर येथे कुटुंबासह राहत होती.

बुधवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास नायला आईसोबत दवाखान्यात जात होती. दरम्यान, खारकोपर गाव येथून उलवे सेक्टर आठच्या दिशेने जाणाऱ्या पिकअपचालकाने वाहन निष्काळजीपणे मागे घेतले. यावेळेस आईसह चालत जात असलेल्या नायलाला पिकअपची धडक लागली. त्यामुळे ती पिकअपच्या चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर उलवे पोलिसांनी टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

## शेतकऱ्यांना 'किसान ओळखपत्रांचे' वाटप

**कर्जत :** शेतकऱ्यांना सशक्त व समृद्धीसाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमानाने ॲग्रिस्टॅक ही एक क्रांतिकारी संकल्पना अमलात आली आहे. याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली आहे. कर्जत तालुक्यातील कडाव येथील मंडळ कार्यालयात शेतकऱ्यांना किसान ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले.

ॲग्रिस्टॅक म्हणजे शेतकरी माहिती संच, हंगामी पीक माहिती



संच, भू संदर्भीय भूभाग माहिती संच याची निर्मिती म्हणजे ॲग्रिस्टॅक या संकल्पनेतून शेतकरी, विक्रेते व सरकार यांना एकत्र ठेवते तसेच शेती प्रक्रियेतील अचूक माहिती मिळते व पारदर्शकता कायम राहते, ॲग्रिस्टॅकमुळे शेतकऱ्यांना अनेक फायदे मिळणार आहेत, किसान ओळखपत्र हे शेतकऱ्यांना अनिवार्य असून तो देण्यासाठी कर्जत तालुक्यात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

## ॲग्रिस्टॅक योजनेचे सर्व्हर डाऊन; शेतकरी त्रस्त

**पेण :** ॲग्रिस्टॅक अंतर्गत सुरू असलेल्या शिबिराच्या माध्यमातून शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर अंतर्गत ॲग्रिस्टॅक हा प्रकल्प संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविला जात आहे. त्या अनुषंगाने ॲग्रिस्टॅक संकल्पनेच्या शेतकरी ओळख क्रमांक निर्मिती प्रक्रियेस गतिमान करण्यासाठी आता राज्यात नागरी सुविधा केंद्राची मदत घेण्यात आली आहे. मात्र ॲग्रिस्टॅकचे सर्व्हर



वारंवार डाऊन व सावकाश चालत आसल्याने शेतकऱ्यांना तासन्तास सीएससी केंद्रावर थांबून राहण्याची वेळ आली आहे. मात्र थांबून सुद्धा ऑनलाइन होईल याची खात्री नसते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाच्या भोंगळ कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली आहे. सदर योजनेच्या सरोवरचे काम शासनाने व्यवस्थित करावे, नंतर शेतकऱ्यांना आनलाइन करण्याची घोषणा करावी, असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.

## महामार्गातील खड्ड्याने घेतला दुचाकीस्वाराचा बळी

**भिवंडी :** मुंबई-नाशिक महामार्गावरील खड्ड्यामध्ये दुचाकी पडल्याने मागून आलेल्या ट्रकखाली दुचाकीवरील दोघेही अडकले. त्यापैकी एकाचा पाय ट्रकच्या चाकाखाली गेल्याने तो गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. आय्याज रज्जाक शेमले (२०) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव असून त्याच्यासोबत दुचाकीवर असलेला जावेद अन्सारी (२१) असे दोघे एकत्र दुचाकीवरून प्रवास करीत मुंबईच्या दिशेने १९ जानेवारी रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास जात होते. अंजूरदिवे गावाजवळ कसबा धाब्यासमोर असलेल्या खड्ड्यात त्यांची दुचाकी पडली. तेव्हा मागून आलेल्या ट्रकखाली ते दोघे अडकले. जावेद हा त्याचे जॅकेट फाडून बाहेर निघाला तर अय्याज याचा पाय चाकाखाली अडकला. त्याला बाहेर काढून सायन हॉस्पिटल येथे नेले असता त्यास डॉक्टरांनी मयत झाल्याचे सांगितले.


**बेलापूर न्यायालयात समुपदेशन केंद्र कार्यान्वित**

# कौटुंबिक वाद सोडवण्यासाठी 'सुकून' प्रकल्प

- सध्या १८०० हून अधिक कौटुंबिक प्रकरणे प्रलंबित
- आठवड्यातून एक दिवस असणारी ही सेवा पूर्णपणे मोफत

**नवी मुंबई :** पती पत्नीमधील वादासह अन्य कौटुंबिक वादाची संख्या दाखल होण्याचे प्रमाण वाढल्यामुळे न्यायालयात दावा दाखल करण्यापूर्वी दोन्ही पक्षकारांमध्ये समुपदेशकांच्या माध्यमातून वाद मिटवण्यासाठी बेलापूर येथील कौटुंबिक न्यायालयात सुकून प्रकल्प राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य विधी प्राधिकरण मुंबई व टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या (टीस) माध्यमातून शनिवार दि.१ फेब्रुवारपासून 'सुकून' समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाले आहे. पती-पत्नीमधील वाद सामंजस्याने कसे सोडवता येतील, एकमेकांपासून वेगळे झाल्यानंतर देखील त्यांच्यातील संबंध सुसह्य कसे राहतील, यासह इतर कौटुंबिक वादावर टीस संस्थेद्वारा नियुक्त समुपदेशक प्रयत्नशील राहणार आहेत.

कौटुंबिक वादामुळे व्यक्तींमध्ये निर्माण होणारा मानसिक ताण तणाव कमी करण्यासाठी टीआयएसएसने महाराष्ट्र राज्य कायदेशीर सेवा प्राधिकरण (एमएसएलएसए) च्या समन्वयाने 'सुकून' हा प्रकल्प विकसित केला आहे. 'सुकून' कौन्सिलिंग सेंटर हा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या स्कूल ऑफ ह्यूमन इकोलॉजीचा एक फील्ड ॲक्शन प्रोजेक्ट आहे. बेलापूर येथील सहाव्या मजल्यावरील कुटुंब न्यायालयाच्या



आवारात 'सुकून' समुपदेशन केंद्राला जागा व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून 'सुकून' प्रकल्प सुरू करणारे बेलापूर हे पाचवे न्यायालय असणार आहे.

सद्यस्थितीत 'सुकून' समुपदेशन केंद्र आठवड्यातून एक दिवस सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. त्यानंतर समुपदेशनाच्या कालावधीत वाढ होणार आहे. समुपदेशनाकरिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून ही सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या केंद्रात समुपदेशन करण्यास येणाऱ्या पती-पत्नींची व कौटुंबिक वादातील अन्य व्यक्तींची माहिती गोपनीय ठेवली जाणार आहे. बेलापूर कौटुंबिक न्यायालयात सध्या १८०० हून अधिक कौटुंबिक प्रकरणे प्रलंबित असून या प्रलंबित प्रकरणातील व्यक्तींची 'सुकून' समुपदेशन केंद्रात समुपदेशन केले जाणार आहे.

बेलापूर न्यायालयातील सहाव्या मजल्यावरील कौटुंबिक न्यायालयातील 'सुकून' या समुपदेशन केंद्राचे उद्घाटन शनिवारी सकाळी १० वाजता मुंबई उच्च न्यायालयाच्या न्या. रेवती मोहिते-डेरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न्या. डॉ. रचना तेहरा यांच्यासह न्यायालयातील सर्व न्यायाधीश व वकील मंडळी उपस्थित होते.

> कौटुंबिक वादामुळे जे जोडपे एकत्र राहू इच्छित नसेल तर वेगळे झाल्यानंतर देखील भविष्यात त्यांच्यात कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवू नये, ते चांगले तणावरहीत राहावेत, त्यांचे आयुष्य सुकून राहावे यासाठीच या प्रकल्पाचे नाव 'सुकून' ठेवण्यात आले आहे. 'सुकून' प्रकल्पांतर्गत स्ट्रेस मॅनेजमेंटचे वर्कशॉप देखील आयोजित केले जाणार आहे. त्यासाठी सामाजिक संस्थांमधील तज्ज्ञ सदस्यांचे पॅनल निर्माण करण्यात आले आहे. कौटुंबिक न्यायालयात प्रलंबित प्रकरणातील दोन्ही वादी-प्रतिवादींनी 'सुकून' समुपदेशन केंद्राचा लाभ घ्यावा.
>
> - **न्यायमूर्ती डॉ. रचना तेहरा**, बेलापूर कौटुंबिक न्यायालय